Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

Original Article

# बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना: एक अभ्यास

**संजय लक्ष्मण मुंढे[1], डॉ. राजेंद्र तुलसीदास आहिरे[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, म.वि.प्र. समाजाचे के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक
[2]सहाय्यक प्राध्यापक, म.वि.प्र. समाजाचे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वणी, ता.दिंडोरी, नाशिक
**Email:** sanjaymundhe78@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180201
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 2(A)
Pp. 1-3
February - 2026

**Submitted:** 15 Jan. 2026
**Revised:** 25 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***गोषवारा***

*महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकांचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास व्हावा या उद्देशाने आदिवासी विकास विभाग समाज कल्याण विभागातून सन १९८३ मध्ये वेगळा करण्यात आला. आदिवासी विकास विभाग आदिवासींसाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या माध्यमातून शैक्षणिक, स्वयं रोजगार, उत्पन्न वाढीच्या, प्रशिक्षणाच्या अशा अनेक योजना राबविल्या जातात. आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी आदिवासी उपयोजनेतून (क्षेत्रांतर्गत आणि क्षेत्राबाहेरील) सन १९९२-९३ पासून हि योजना राबविण्यात येते. या योजनेतून आदिवासी शेतकऱ्यांना नविन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरींग, वीज जोडणी आकार, शेततळयांचे प्लॅस्टिक अस्तरीकरण, परस बाग, विजपंप/तेलपंप, एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सुक्ष्म सिंचन संच अ. ठिबक सिंचन आ. तुषार सिंचन या साठी १००% अनुदान देण्यात येते. बदललेल्या परिस्थितीनुसार शेतकऱ्यांची आवश्यकता विचारात घेऊन सदर योजनेत सुधारणा करून या योजनेचे नाव बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना या नावाने, दिनांक १७ डिसेंबर २०१७ शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीसाठी लागणाऱ्या औजारे देऊन त्यांचे उत्पन्न व जीवनमान उंचवण्याचे कार्य शासनाद्वारे आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून करत आहे. याचा मुख्य उद्देश दारिद्र्यात जीवन जगात असलेल्या आदिवासींना दारिद्र्यातून बाहेर काढणे हा आहे.*

***कळीचे शब्द:*** *अनुसूचित, एकात्मिक, प्रकल्प, प्रशिक्षण, रोजगार*

**प्रस्तावना**

ब्रिटीश राजवटीने आदिवासींचे शोषण फार मोठ्या प्रमाणात केले. आदिवासी हे भारताचे मूळ निवासी असल्याने त्यांच्या अधिपत्याखाली असलेले जल, जंगल व जमीन सुस्थितीत ठेवली होती. ब्रिटीशांची सत्ता आल्यानंतर त्यांनी आदिवासींच्या ताब्यात असलेल्या नैसर्गिक साधनसंपती ओरबाडण्यास सुरुवात केली. आदिवासी राज्यकर्त्यांनी यांस विरोध करण्यास सुरुवात करून ठीकठिकाणी ब्रिटीश शासनाच्या विरोधात उठाव सुरु केले. शसस्त्र बळाचा वापर करून त्या मोडून काढण्यात आल्या. स्वाभिमानी आणि लढवय्या वृत्तीच्या आदिवासींना नियंत्रणात ठेवण्यासाठी केवळ बळाचा वापर हा कायमस्वरूपी उपाय नाही हे ब्रिटीशांच्या लवकरच लक्षात आले. त्यामुळे त्यांनी संघर्षाऐवजी आदिवासींशी मैत्री करण्याचे धोरण अवलंबले. तेव्हापासून आदिवासींसाठी अनेक सुधारणा करण्यात येऊ लागल्या.

१९४७ ला भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर असे वाटले होते कि, आदिवासींसाठी शासनातर्फे अनेक सुधारणा केल्या जातील, परंतु असे काही घडले नाही. भारताच्या राज्यघटनेत घटनाकारांनी आदिवासींना अनुसूचित जमाती या अनुसूचित टाकल्यामुळे आरक्षण लागू झाले. परंतु शासनाच्या उदासीनतेमुळे आदिवासींच्या जीवनात कोणताही बदल झाला नाही. केंद्रीय व राज्य पातळीवर आदिवासींच्या उत्थानासाठी अनेक योजना तयार झाल्या पण त्या आदिवासींपर्यंत पोहचल्याच नाही.

**अभ्यसाचे उद्दिष्ट्य**

१) बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना अभ्यासणे..

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*संजय लक्ष्मण मुंढे, संशोधक विद्यार्थी, म.वि.प्र. समाजाचे के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक*

**How to cite this article:**
*मुंढे, . संजय . लक्ष्मण ., & आहिरे, . राजेंद्र . तुलसीदास . (2026). बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना: एक अभ्यास. Journal of Research & Development, 18(2(A)), 1–3.* https://doi.org/10.5281/zenodo.18923072

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18923072
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

**अभ्यासाची पद्धती**

हा अभ्यास प्रामुख्याने शासनाने प्रकाशित केलेल्या माहितीवर आधारित आहे. जसे शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाचे संकेतस्थळ, त्याचबरोबर यामध्ये दुय्यम स्त्रोतांचाही वापर करण्यात आला आहे. यामध्ये पुस्तके, नियतकालिके व वृत्तपत्रांचा समावेश आहे.

**योजनेची माहिती**

सन १९७५-७६ पासून आदिवासी उपयोजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या निधीचा विनियोग करण्यासाठी ज्या भागात आदिवासींची लोकसंख्या जास्त आहे अशा भागात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांची स्थापना करण्यात आली. राज्यातील आदिवासींचे संस्कृती व त्यांच्या परंपरा यांना कोणतीही बाधा न येता त्यांना सक्षम बनवून त्यांचा विकास सुनिश्चित करण्यासाठी सन १९८३ मध्ये आदिवासी विकास विभाग, समाजकल्याण विभागातून वेगळा करण्यात आला. याद्वारे अनुसूचित जमातीचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सुधारणांच्या उपाययोजना आखून त्यांना इतर समाजाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न चालू आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांच्या माध्यमातून शासनाच्या सर्व योजनांची अंमलबजावणी केली जाते. महाराष्ट्रात एकूण २९ प्रकल्प कार्यालये आहेत. आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी आणि राहणीमान उंचावण्यासाठी या शेतकऱ्यांना कृषीसाठी अर्थसहाय्य देण्याची योजना सन १९९२-९३ पासून राबविली जात होती. बदललेल्या परिस्थितीनुसार या योजनेत सुधारणा करण्याची गरज वाटू लागली, त्याप्रमाणे या योजनेत सुधारणा करून हि योजना बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना या नावाने दि. ३० डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयाने कार्यान्वित करण्यात आली.

सदर योजनेत सध्या नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरण, सूक्ष्म सिंचन अ) ठिबक सिंचन ब) तुषार सिंचन, परसबाग, पंप संच (डीझेल/विद्युत) आणि पी.व्ही. सी. पाईप्स अशा ९ घटकांसाठी विहित मर्यादेत १०० टक्के अनुदान दिले जाते.

**सदर योजनेत खालील घटकांसाठी त्यापुढे नमूद मर्यादेत अनुदान दिले जाते.**

| अ.क्र. | बाब | उच्चतम अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| १. | नवीन विहीर | २५००००/- |
| २. | जुनी विहीर दुरुस्ती | ५००००/- |
| ३. | इनवेल बोअरिंग | २००००/- |
| ४. | वीज जोडणी आकार | १००००/- |
| ५. | शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरण | १०००००/- |
| ६. | सूक्ष्म सिंचन<br>अ) ठिबक सिंचन<br>ब) तुषार सिंचन | <br>५००००/-<br>२५०००/- |
| ७. | परसबाग | ५००/- |
| ८. | पंप संच (डीझेल/विद्युत) | २००००/- (१० अश्वशक्ती क्षमते पर्यंतचे पंप संच करिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत मंजूर असलेल्या मापदंडानुसार १०० टक्के अनुदान देय राहील. |
| ९. | पी.व्ही. सी. पाईप्स | ३००००/- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत मंजूर असलेल्या मापदंडानुसार १०० टक्के/६००मी. पाईप्सच्या मर्यादेत यापैकी अनुदान देय राहील. |

(स्त्रोत: कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. आउयो-२४१६/प्र.क्र.१७७/४अे, दि. १७ ऑगस्ट, २०१७)

या योजनेत वरील ९ बाबी असून लाभ पॅकेज स्वरूपात देण्यात येतो. खालील तीन पॅकेजमधील एकाच पॅकेजचा लाभ लाभार्थीस देता येतो. आदिवासी उपयोजने अंतर्गत अथवा शासनाच्या कोणत्याही योजनेतून ज्या शेतकऱ्यांनी याबुर्वी नवीन विहीर व जुनी विहीर दुरुस्ती या घटकांचा लाभ गेटला असेल अशा लाभार्थीव्यतिरिक्त इतर सर्व लाभार्थ्यांना बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनेअंतर्गत नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती व शेततळ्याचे अस्तरीकरण यापैकी एक घटकाचा व त्यासोबतच्य पॅकेजचा लाभ देता येईल.

**लाभार्थी पात्रतेच्या अटी**

१) लाभार्थी ह अनुसूचित जमातीचा शेतकरी असला पाहिजे.
२) शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.
३) नवीन विहिरीचा लाभ घ्यावयाचा असल्यास शेतकऱ्याकडे त्याचा स्वतःचे नावे किमान ०.४०हेक्टर व नवीन विहीर खोदणे हि बाब वगळून योजनेतील अन्य बाबींसाठी किमान ०.२० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. आणि योजनेंतर्गत सर्व बाबींसाठी कमाल क्षेत्र मर्यादा ६.०० हेक्टर शेतजमीन राहील. आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी दुर्गम भागात व विखंडीत असल्याने ०.४० हे. पेक्षा कमी जमीन धारणा असलेले दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र असल्यास त्यांची एकत्रीत जमीन किमान ०.४० हे. इतकी होत असल्यास त्यांनी करार

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

लिहून दिल्या त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञयराहील. त्याचप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना कमाल धारणा क्षेत्राची अटलागू असणार नाही.

४) शेतकऱ्यांच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ व ८अ उतारा असणे आवश्यक आहे. (नगर पंचायत, नगरपालिका व महानगर क्षेत्राबाहेरील)

५) लाभार्थ्याकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.

६) लाभार्थ्याचे बँक खाते असणे व सदर बँक खाते आधारकार्डशी सलग्न असणे आवश्यक आहे.

७) परंपरागत वन निवासी (वन अधिकारी मान्यता) अधिनियम, २००६ नुसार वनपट्टेधारक शेतकऱ्यांची या योजनेंतर्गत प्राधान्याने लाभार्थी म्हणून निवड करावी व त्यानंतरच अन्य शेतकऱ्याची लाभार्थी म्हणून निवड करण्यात यावी.

८) अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त नसावे.

९) ज्या शेतकऱ्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १,५०,०००/- चे मर्यादेत आहे अशा शेतकऱ्यांनी संबंधित तहसीलदार यांचेकडून उत्पन्नाचा अध्यावाट दाखला घेणे व अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

अर्ज कसा करावा:

योजनेंतर्गत ऑनलाईन अर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर सुविधा उपलब्ध केलेल्या दिनांकापासून इच्छुकांना अर्ज करण्याकरिता एक महिन्याचा कालावधी देण्यात येतो. या संकेतस्थळावर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदाराने आवश्यक कागदपत्रासह त्याचा ऑनलाईन अर्ज www.agriwell.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दाखल करावा.

## निष्कर्ष

आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता हि योजना सुरु करण्यात आली होती. महाराष्ट्रातील आदिवासी शेतकऱ्यांसाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना वरदान ठरली आहे. या योजनेतून अनुसूचित जमातीतील शेतकऱ्यांना नवीन विहीर, जुन्या विहिरींची दुरुस्ती आणि सिंचन संचासाठी आर्थिक मदत देऊन आर्थिक सक्षमीकरण करत आहे. डोंगराळ व दुर्गम भागातील शेतकऱ्यांना शेतीसती शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देते. पावसाच्या पाण्यावर अवलंबून न राहता, सिंचनामुळे शेतकरी दोन किंवा तीन पिके घेऊ शकतात, ज्यामुळे त्यांचा आर्थिक स्तर आणि जीवनमान उंचावण्यास मदत होत आहे. शाश्वत सिंचन सुविधांमुळे शेतकऱ्यांना आधुनिक शेतीकडे वळण्याची प्रेरणा मिळत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीममुळे अनुसूचित जमातीतील शेतकरी केवळ स्वयंपूर्णच होत नाहीत, तर राज्याच्या कृषी विकास प्रक्रियेतहीमुख्य प्रवाहात येत आहेत.

## संदर्भसूची

१. वर्मा आर.सी., २००३, भारतीय जमाती काल, आज आणि उद्या, निदेशक, प्रकाशन विभाग, सूचना आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार
२. डॉ. गारे गोविंद, २०००, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टीनेंन्टल प्रकाशन, पुणे
३. माहिती पुस्तिका, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, २०१९-२०
४. https://tribal.maharashtra.gov.in संकेतस्थळ, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन.
५. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. आउयो-२४१६/प्र.क्र.१७७/४अे, दि. ९ ऑगस्ट, २०१७
६. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. आउयो-२४१७/प्र.क्र.१२७/३अे, दि. ३० डिसेंबर, २०१७
७. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१२७/३अे, दि. १७ जुलै, २०१८
८. राअसुअ मा.सु. जाक्र/विप्र-१/२२१/१८ दि.१५/५/१८ व जाक्र/विप्र-२/१८१/१८ दि.१६/५/१८